बुधवार, दि १८ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### जालना मनपातील समिती निवड बिनविरोध

# प्रभाग क्रमांक ३ चे चारही नगरसेवक समितीत

### पाणी पुरवठा सभापती पुनम स्वामी, स्वच्छता व आरोग्य कपिल भुरेवाल यांच्याकडे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या विविध महत्त्वाच्या समित्यांच्या सभापती व उपसभापती निवडीची प्रक्रिया आज (दि. १७ मार्च २०२६) शांततेत आणि बिनविरोध पार पडली. अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या नवीन सभागृहात सकाळी ११ वाजल्यापासून ही विशेष सभा घेण्यात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार पार पडलेल्या या प्रक्रियेत पालिकेच्या सर्व सहा प्रमुख समित्यांचे पदाधिकारी बिनविरोध निवडून आले. विशेष म्हणजे, या निवडीत प्रभाग क्रमांक ३ मधील तीन नगरसेवकांना महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याने या प्रभागाचे वर्चस्व अधोरेखित झाले आहे.

**स्थायी समितीवर पांगारकर**

महानगरपालिकेतील सर्वात प्रभावी मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या सभापतीपदी अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहर पांगारकर यांची निवड करण्यात आली. या निवडीकडे संपूर्ण राजकीय व प्रशासकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले होते.

**इतर समित्यांची रचना पुढीलप्रमाणे**

महिला व बालकल्याण समिती सभापती : सौ. संध्या संजय देठे, उपसभापती : सौ. पदमा अजित मानधनी

स्वच्छता व आरोग्य समिती सभापती : कपिल श्रावण भुरेवाल, उपसभापती : सौ. अनामिका विजय पांगारकर

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती : सौ. पूनम राजेश स्वामी, उपसभापती : ॲड. भगवान मारोती चांदोडे

शिक्षण व विद्युत समिती सभापती : सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस, उपसभापती : सौ. वर्षा वैजिनाथ राऊत

बांधकाम समिती सभापती : सौ. माया मनोजकुमार जोशी, उपसभापती : सौ. ऐश्वर्या अशोक आडेकर

**प्रभाग क्रमांक ३ चे ठळक प्रतिनिधित्व**

या निवड प्रक्रियेत प्रभाग क्रमांक ३ मधील चारही नगरसेवकांना महत्त्वाच्या समित्यांमध्ये स्थान मिळाल्याने राजकीय समतोलात या प्रभागाचे वजन वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. स्थानिक विकासकामांमध्ये या प्रभागाची भूमिका अधिक प्रभावी राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध प्रक्रिया**

नगरसचिव तथा सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव यांच्या देखरेखीखाली संपूर्ण निवड प्रक्रिया पार पडली. १२ मार्च रोजी नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले होते, तर आज छाननीनंतर अधिकृत घोषणा करण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत




शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

**नवीन पदाधिकाऱ्यांचा विकासावर भर**

नवनियुक्त सभापतींनी प्रसारमाध्यमांशी बोलताना शहराच्या विकासकामांना गती देणे, पाणीपुरवठा सुरळीत करणे आणि स्वच्छता मोहिमेला प्राधान्य देणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले.

नवीन समित्यांची स्थापना झाल्यानंतर आता प्रत्यक्ष कामगिरीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पाणीटंचाई, स्वच्छता, रस्त्यांची अवस्था आणि शिक्षण क्षेत्रातील सुविधा या प्रमुख प्रश्नांवर समित्यांनी कितपत प्रभावी कामगिरी केली, यावर त्यांच्या यशाचे मोजमाप होणार आहे. बिनविरोध निवड ही सकारात्मक बाब असली तरी, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आता कृतीतून परिणाम दाखवणे हीच खरी कसोटी ठरणार आहे.

### दिव्यांगांच्या मागण्यांसाठीचे आमरण उपोषण स्थगित

# मनपाकडून महत्त्वपूर्ण आश्वासने

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील दिव्यांगांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण आज (दि. १७ मार्च) अखेर स्थगित करण्यात आले.

प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासनांसाठी पत्रकार दीपक शेळके आणि पत्रकार भरत मानकर यांनी मध्यस्थी केली. आणि उपोषण स्थगीत करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून दिव्यांगांच्या मूलभूत सुविधांसाठी आणि हक्कांसाठी हे उपोषण सुरू होते. या आंदोलनाची दखल घेत जालना महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर आणि दिव्यांग विभागाच्या अधीक्षक प्रमिला मोरे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. यावेळी प्रशासनाकडून विविध महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा करण्यात आली.

**मनपाकडून दिलेली प्रमुख आश्वासने**

महानगरपालिकेतील दिव्यांग कार्यालय तळमजल्यावरील आस्थापना विभागात हलविण्यात येणार, जेणेकरून दिव्यांगांना




सहज प्रवेश मिळेल. महानगरपालिकेत दिव्यांगांच्या सोयीसाठी व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यास मंजुरी.

दिव्यांगांसाठी स्वतंत्र ‘दिव्यांग भवन’ उभारणे, घरकुल योजनेसाठी दिव्यांगांना जागा उपलब्ध करून देणे, दिव्यांगांना घरपट्टी (मालमत्ता कर) व पाणीपट्टीमध्ये ५० टक्के सवलत ही धोरणात्मक निर्णय असून यासाठी प्रशासकीय पातळीवर निर्णय घेऊ. सर्व मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत प्रशासनाने लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर आणि अधीक्षक प्रमिला मोरे यांच्या हस्ते पाणी पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली.

या आंदोलनामुळे जालना शहरातील दिव्यांगांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले. विशेषतः दिव्यांग कार्यालयाची जागा, मूलभूत सुविधा आणि कर सवलती यांसारख्या मुद्द्यांवर ठोस पावले उचलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

उपोषणादरम्यान अनिल मगदुले, रवि तायडे, शंकर शिरगुळे, सुरेश बोर्डे, सविता बोराडे, सगिता कोरडे, अंकुश वाकचौरे, विलास काबळे, सुनिता लोळगे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवत दिव्यांगांच्या हक्कांसाठी एकजूट दाखवली.

### जालना पाटबंधारे विभागाचा कडक इशारा

# पाणीपट्टी न भरल्यास पाणी व वीज पुरवठा खंडित करणार

**जालना । प्रतिनिधी -** सर्व थकीत बिगर सिंचन योजनाधारकांना कळविण्यात येते की जालना पाटबंधारे विभाग जालना पाटबंधारे विभाग जालना अंतर्गत पाटबंधारे प्रकल्पातुन बिगर सिंचन योजनेस पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनार्थ पाणी पुरवठा करण्यात येतो. वापरलेल्या पाण्याच्या प्रयोजनार्थ विभागाची १२६४.३९ लक्ष रुपये बिगर सिंचन पाणीपट्टी थकीत आहे. थकीत पाणीपट्टी भरणा सर्व योजना धारकांनी आपल्या योजनेची थकीत बिगर सिंचन पाणीपट्टी ७ दिवसाच्या आत जालना पाटबंधारे विभाग जालना यांच्या नावे धनादेशाव्दारे भरणा करण्यात यावा, अन्यथा महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ भाग ६, कलम ४९ (ज) अन्वये संबंधीत योजनेचा पाणी पुरवठ्यासह विद्युत पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. असे आवाहन कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### २४ मार्चला जालना येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन

# नवउद्योजकांना मिळणार मार्गदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील सूक्ष्म व अतिसूक्ष्म उद्योजकांच्या व्यवसाय विस्ताराला चालना देण्यासाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि ‘दे आसरा’ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष उद्योजक मेळावा व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवार दि.२४ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे पार पडणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास केंद्र, जालना यांनी केले आहे.

स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणाऱ्या सूक्ष्म उद्योजकांना पान २ वर

## संपादकीय

# माध्यमविश्वातील विश्वासार्हतेचा गंभीर प्रश्न

जालना येथील 'दैनिक पार्श्वभूमी' या वृत्तपत्राविरोधात उघडकीस आलेले आरोप केवळ एका माध्यमसंस्थेपुरते मर्यादित नसून, संपूर्ण माध्यमविश्वाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहेत. १९९६ ते २०२० या कालावधीत आरएनआय प्रमाणपत्राशिवाय वृत्तपत्र प्रकाशित झाल्याचा आरोप, तसेच शासनमान्य जाहिरात यादीत कथितरीत्या समावेश करून कोट्यवधींचा लाभ घेतल्याचे दावे हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. लोकशाही व्यवस्थेत माध्यमे ही 'चौथा स्तंभ' म्हणून ओळखली जातात. समाजाला सत्य माहिती देणे, सत्तेवर प्रश्न उपस्थित करणे आणि जनतेचा आवाज बनणे ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र, जर माध्यमसंस्था स्वतःच नियमबाह्य मार्गाचा अवलंब करत असतील, तर समाजाचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, सखोल आणि पारदर्शक चौकशी होणे अत्यावश्यक ठरते. आरएनआय नोंदणी ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून, ती वृत्तपत्राच्या वैधतेची आणि विश्वासार्हतेची हमी असते. शासनमान्य जाहिरातींचा लाभ घेण्यासाठी ही अट अनिवार्य आहे. असे असताना, जर खोटी कागदपत्रे सादर करून जाहिरात यादीत समावेश करण्यात आला असेल, तर हा केवळ नियमभंग नसून शासनाची दिशाभूल आणि सार्वजनिक निधीचा गैरवापर आहे. याचप्रमाणे, छपाईच्या प्रतींच्या संख्येबाबत केलेला दावा आणि प्रत्यक्षात होणारी छपाई यामधील तफावतही चिंताजनक आहे. जाहिरातींचे दर आणि वितरण यावर छपाईची संख्या थेट परिणाम करत असल्याने, यामध्ये फसवणूक झाल्यास शासनाच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडू शकतो. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते दीपक शेळके यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण हे केवळ वैयक्तिक आंदोलन नसून, पारदर्शकतेसाठी आणि न्यायासाठी उभारलेला आवाज आहे. प्रशासनाने याची दखल घेऊन चौकशीचे आश्वासन दिले, ही सकारात्मक बाब असली तरी केवळ आश्वासनांवर हा विषय थांबू नये. ठोस कारवाई, दोषींवर कठोर शिक्षा आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. यासोबतच, या प्रकरणातून शासन यंत्रणेलाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. अनेक वर्षे तक्रारी देऊनही कारवाई न होणे, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करते. जबाबदार अधिकाऱ्यांची उत्तरदायित्व निश्चित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. शेवटी, माध्यमस्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नव्हे. स्वातंत्र्यासोबत जबाबदारीही तितकीच आवश्यक आहे. जालना येथील हे प्रकरण हे संपूर्ण राज्यातील माध्यमांसाठी एक इशारा आहे नियमांचे पालन, पारदर्शकता आणि प्रामाणिकता यांच्याशिवाय विश्वास टिकू शकत नाही. आता सर्वांचे लक्ष एका गोष्टीकडे लागले आहे चौकशी होईल का केवळ आश्वासन? की खरोखरच सत्य समोर येईल आणि दोषींवर कारवाई होईल?

# गुढीपाडवा: संपूर्ण सृष्टीसाठी शुभ, समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते.फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य.हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात.कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे.हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला ''गुढीपाडवा''सण साजरा करतो. आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते. गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच!कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले.त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला.मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे. अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी,कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो.कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दुःख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे.आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो.त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो.गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते.इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो.परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने,आदरतीथ्याने,प्रेमाने,मानसन्माने आणि मुख्यत्वे करून आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो.त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो.महाराष्ट्रासह भारतात बदलते हवामान लक्षात घेता व वाढते प्रदूषण पहाता आणि वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे.यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना सावली,मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्या खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# सुशिक्षित बेरोजगारांना प्रत्यक्ष निवडीची सुवर्णसंधी

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी चालून आली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि.१८ मार्च २०२६ रोजी विशेष प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत पात्र उमेदवारांना थेट मुलाखतीद्वारे जागेवरच नोकरी मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.उमेदवारांनी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास केंद्र, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे उपस्थित रहावे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील कौशल्य विकास केंद्रात सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत ही प्रक्रिया पार पडणार आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये रिद्धी सिद्धी सर्विसेस, जालना या संस्थेकडून एकूण २० रिक्त जागांसाठी भरती केली जाणार आहे. यामध्ये बारावी उत्तीर्ण उमेदवारांची टेलीकॉलर १० पदे, सेल्स अधिकारी १० पदेभरली जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीला येण्यापूर्वी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. वेबसाइट: www.rojgar.mahaswayam.gov.in किंवा www.ncs.gov.in वर भेट द्यावी. मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या किमान दोन प्रती सोबत ठेवणे अनिवार्य आहे. जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुण-तरुणींनी या रोजगाराच्या पर्वणीचा लाभ घ्यावा. खासगी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांमध्ये करिअर करण्याची ही उत्तम संधी आहे, असे सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

पान १ वरुन

## नवउद्योजकांना ...

अनेकदा आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि वित्तीय व्यवस्थापनात अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर, उद्योजकांना योग्य दिशा मिळावी आणि त्यांच्या शंकांचे निरसन व्हावे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. या सत्रात दे आसरा फाउंडेशनचे तज्ज्ञ आणि जिल्ह्यातील यशस्वी उद्योजक मार्गदर्शन करणार असून, नेटवर्किंग वाढवण्यासाठीही ही मोठी संधी ठरणार आहे. या मेळाव्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांनी https://forms.gle/DtPKMVVk2E3GmKBc7 या लिंकवर आपली नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# हिंदू-नव वर्षांची सुरुवात; गुढीपाडवा

हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुध्द प्रतिपदेला ‘‘गुढी पाडवा‘‘सण आपण साजरा करतो.आपण साडेतीन मुहूर्त मानतो,त्यातील गुढीपाडवा हे एक मुहूर्त आहे.

कॅलेंडरनुसार, गुढी पाडवा चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला सुरू होतो. प्रतिपदा तिथी १९ मार्च रोजी सकाळी ६:५२ वाजता सुरू होईल आणि २० मार्च रोजी पहाटे ४:५२ पर्यंत चालणार आहे. तिथीनुसार, गुढी पाडवा १९ मार्च २०२६ रोजी साजरा केला जाईल. चैत्र नवरात्र देखील याच दिवशी सुरू होईल.

‘हिंदु संस्कृतीमध्ये गुढीपाडवा हा केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नसून, तो अधर्मावर धर्माच्या विजयाचे प्रतीक असलेला अत्यंत शुभ दिवस आहे. प्रभु श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून आणि आसुरी शक्तींचा विनाश करून जेव्हा अयोध्येत परतले, तेव्हा अयोध्येतील भाविक नागरिकांनी आनंद आणि विजय यांचे प्रतीक म्हणून घराघरांवर गुढ्या उभारल्या होत्या. तोच विजयोत्सव आणि तीच आदर्शाची गुढी आजही आपल्याला खऱ्या अर्थाने ‘रामराज्य’ स्थापन करण्याची प्रेरणा देत आहे.

आपल्या दाराशी गुढी उभारणे हे विजयाचे तसेच समृद्धीचे प्रतिक समजले जाते. याच दिवशी अनेक जण नविन व्यवसायाला प्रारंभ करतात. नविन वाहन ,नविन फ्लॅट, घर,अशा नानाविध वस्तूंची खरेदी करतात. जो तो आपापल्या ऐपती प्रमाणे सोने खरेदी करतात. एक ग्रॅम का असेना,पण घेतात. त्या दिवशी ते महत्त्वाचे मानले गेले आहे. ते समृद्धीचे समजतात.

गुढीपाडव्याचे दिवशी अनेक जण शुभ संकल्प करतात. ह्या दिवशी केलेले संकल्प फलदायी ठरतात.असा अनेकांना अनुभव आहे.

गुढीपाडवा आपसातील वैरभाव, मतभेद, विसरून शांतता मिळवून देणारा आनंददायी असा सण आहे.

नवसंवत्सराचा प्रारंभ होतो. नववर्षाचा हा पहिला दिवस महत्वाचा तसेच पवित्र समजला जातो. ह्याच दिवशी नविन वर्षाचे पंचांग आणून त्याचेही पूजन केले जाते.

अनेक शहरात, गावात, पहाटेच भक्तिसंगिताचे पाडवा पहाट सारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. अनेक ठिकाणी पारंपारिक वेशभूषा करून शोभायात्रा काढल्या जातात, आणि नववर्षाचे स्वागत केले जाते. आनंददायी सुरुवात केली जाते.

नविन वर्षाचे स्वागतासाठी दारा समोर गुढी उभारली जाते. गुढी हे विजयाचे, मांगल्याचे प्रतिक आहे. सकाळी मंगल स्नानादी उरकून, नविन वस्त्र परिधान करुन, बांबूच्या काठीला पिवळ्या किंवा भगव्या-केशरी रंगाचे वस्त्र नेसवून, गुंडाळून, तांब्याच्या किंवा चांदीचा कलश उलटा ठेवतात. त्याला गंध लावून कडूनिंबाचे पानाचा घोस लावतात. साखरेचा गाठीचा हार, फुलांचा हार घालतात. हळदीकुंकवाने पूजा केली जाते.निरांजन उदबत्ती ओवाळतात. पेढ्याचा नेवैद्य दाखवतात. मंगल वाद्यावर वादन केले जाते. आणि नववर्ष सुखसमृध्दीचे, आनंदाने जावे म्हणून मनोभावे प्रार्थना केली जाते.

गुढी दाराशीच उजव्या बाजूला, तशीच खिडकी मध्ये, गच्चीवरही उभारली जाते. दाराशी सडा टाकून सुंदर रांगोळ्या काढतात. घराच्या मुख्य दरवाज्यावर आंब्याची पाने, झेंडुच्या फुलांचे तोरण लावतात. पूजेनंतर कडूनिंबाची पान आणि गुळ मिश्रण सेवन करतात. येणारे वर्ष आरोग्यदायी जाव, उन्हाळा त्रासदायक ठरु नये हीच त्यामागील भावना असते. तसेच ओवा, मीठ, हिंग, मिरी, आणि साखर हे कडुलिंबाच्या पानात वाटून खातात.




यामुळे पचनक्रिया सुधारणे, पित्ताचा नाश, त्वचा रोग बरे होणे, आदी गोष्टी शक्य होतात. आयुर्वेदात याला खूप महत्त्व आहे.

बहुसंख्य कुटुंबात गुढीपाडव्याला श्रीखंड-पुरीचाच बेत जेवणात असतो.

प्रभु श्रीरारमचंद्राचे विजयाचे प्रतीक, रावणावरच्या विजयाचे कौतुक, असा हा आनंददायी सण.

विजय पताका श्रीरामाची झळकते अंबरी...

प्रभु आले मंदिरी....
गुलाल उधळूनी नगर रंगले...
भक्त जनांचे थवे नाचले...
राम भक्तिचा गंध दरवळे ...
गुढ्या तोरणे,घरोघरी..
गं.घरोघरी.।
प्रभु आले मंदिरी,...
अयोध्येचा आला राजा...

या गाण्यात त्याच खूप छान वर्णन केल आहे.

रावणाच्या त्रासातून मुक्त झाल्यानी, व श्रीरामाचे आगमन झाल्याने नगरवासीय आनंदित झाले आहे.. त्यांनी गुढ्या उभारल्या, तोरणांनी घरे सजविले, गुढीपाडव्याचे दिवशी घरोघरी हे गाणं ऐकायला मिळत.

पार्वतीचा आणि महादेवाचा विवाह पाडव्याच्या दिवशी ठरला असल्याची देखील कथा आहे.

संध्याकाळी परत गुढीची पूजा करुन गुढी उतरवण्याची प्रथा आहे.

गेल्या अनेक वर्षापासूनचा आपल्यावर पाश्चात्यांचा पगडा कायम आहे. एक जानेवारीलाच नववर्ष साजरा करण्याचा पायंडा पडला आहे. ३१ डिसेंबरला मद्यधुंद अवस्थेत सरत्या वर्षाला निरोप द्यायचा, आणि त्याच अवस्थेत नववर्षाच्या स्वागत करायच. फटाके फोडायचे, बघा काय विचित्र आणि हिडीस प्रकार सुरु आहे. मग अनेक प्रकार घडतात.अपघात, मारामाऱ्या, बलात्कार, विनयभंग, संस्कृतीच अधःपतन सुरु आहे. कोण थोपवणार हे सगळं? ज्यांनी काहीतरी करायला हव, ते बसतात मुग गिळून गुपचुप. सरकारी तिजोरीत मात्र खूपसारा पैसा जमा होतो. निरनिराळ्या वृत्तपत्रांतून दारुविक्रीचा उच्चांक जाहीर होतो.विक्रमी विक्री होते. डिसेंबरचा शेवटच्या आठवडा आणि जानेवारीचा पहिला आठवडा पर्यंत शासनाने दारूबंदी करावी,बघा कोण नववर्ष साजर करतो?( नव्वद टक्के लोकांच हे नववर्ष केवळ आणि केवळ मद्य प्राशनासाठी आणि पार्ट्या साठीच

साजर करणं असते हे सांगायला नकोच.)काय साध्य होतय यातून?.

सत्ययुगाचा आरंभ म्हणजे गुढीपाडवा, ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. प्रभूश्रीरामाचे आगमनाचा दिवस. आपला गुढीपाडवा हाच नववर्षाचा दिवस आहे आणि पाश्चात्यांनी आपल्यावर लादलेला नववर्ष दिवस हा मोडीत काढायला हवा आहे. त्यादृष्टीने सर्वसमावेशक प्रयत्न करायला हवे.

गुढीपाडवा.. आध्यात्मिक दृष्टीने अतिशय महत्वाचा दिवस आहे.आणि ते योग्यच आहे.

पाश्चात्त्यांच करत असलेले अंधानुकरण रोखण्यासाठी आपण सर्वानीच पुढाकार घ्यायला हवा. गुढीपाडव्याला मांगल्याची गुढी उभारून, नववर्षाचे स्वागत करुन,एकमेकांना नववर्षाच्या मंगलमय शुभेच्छा देऊन आपला मराठी बाणा जपू या !

गुढीपाडव्याच्या शोभायात्रा गावोगावी निघतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलनही असते. वातावरणात चैतन्य असते.

अशी ही नववर्षाची सुरुवात आनंदाने, उत्साहात करु या.

सर्वाना गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा.!

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव ८९९९५६६९१७**

---

## छत्रपती संभाजीनगर येथे हिंदु राष्ट्र जागृती सभेनिमित्त भव्य वाहनफेरी !

# भव्य शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उदघाटन!

**छत्रपती संभाजीनगर** - शहरातील पिसादेवी परिसरातील पळशी रोड, श्रीराम पेट्रोल पंपच्या पाठीमागे असलेल्या कै. द्रौपदाबाई नानाभाऊ काळे क्रीडा संकुल मैदानावर गुरुवार दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य हिंदु राष्ट्र जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने आज १७ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता वाहनफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या वाहनफेरीला ह.भ.प अरुण पिंपळे महाराज आणि सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सदगुरू नंदकुमार जाधव यांनी पूजन करून आरंभ हरसिद्धी माता मंदिर ते पिसादेवी मंदिर समारोप करण्यात आला.

हिंदु राष्ट्र जागृती सभेच्या निमित्ताने सभा स्थळी १९ मार्च पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत भव्य शिवकालीन शस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात युद्धात वापरली जाणारी विविध शस्त्रे, शिवकालीन नाणी, त्या काळातील पत्रे व संदेश आदी ऐतिहासिक वस्तूंचे दर्शन घडणार असून उपस्थितांना शिवकालीन इतिहासाचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव आणि श्री. सुदाम काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

भाग्यनगर येथील ‘श्रीराम युवा सेने’चे संस्थापक-अध्यक्ष आमदार टी. राजा सिंह, सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव आणि हिंदु जनजागृती समितीच्या मराठवाडा संघटक कु. प्रियांका लोणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या हिंदु-राष्ट्र जागृती सभेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा समन्वयक कु. प्रियांका लोणे यांनी केले आहे.



# मनपाकडून महिला बचत गटांसाठी बीज भांडवल निधीच्या धनादेश वितरीत



**जालना । प्रतिनिधी** - महानगरपालिकेच्या वतीने महिला बचत गटांना स्वावलंबी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजने अंतर्गत आणि दीनदयाल अंत्योदय योजने-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान च्या माध्यमातून बीज भांडवल निधीचे धनादेश महिला बचत गटांना वितरित करण्यात आले. या अंतर्गत जालना अन्न प्रक्रिया व्यवसायात सक्रिय असलेल्या शहरातील ९ महिला बचत गटांना प्रत्येकी ४ लाख रुपये असे एकूण ३६ लाख रुपयांचे धनादेश देण्यात आले.

आज जालना, महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात महिला बचत गटांसाठी बीज भांडवल निधीच्या धनादेश वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.,

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना तसेच दीनदयाल अंत्योदय योजना -राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत महिला बचत गटांना उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.,

या कार्यक्रमात जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांच्या हस्ते महिला बचत गटांना धनादेशांचे वितरण करण्यात आले. यावेळी एकूण ९ महिला बचत गटांना प्रत्येकी ४ लाख रुपये प्रमाणे एकूण ३६ लाख रुपयांचा बीज भांडवल निधी देण्यात आला.,,

दामिनी शहर स्तर संघाच्या माध्यमातून जालना महानगरपालिकेच्या वतीने हा निधी वितरित करण्यात आला. या निधीमुळे महिला बचत गटांना सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी मोठी मदत होणार आहे.,

या योजनेचा लाभ मिळालेल्या बचत गटांमध्ये राजमाता जिजाऊ महिला बचत गट, हिरकणी महिला बचत गट, प्रयास महिला बचत गट, सानवी महिला बचत गट, लाडली महिला बचत गट, प्रतिबिंब महिला बचत गट, सुवर्ण ग्रुप महिला बचत गट, कृतिका महिला बचत गट आणि संयोग महिला बचत गट यांचा समावेश आहे.,

या कार्यक्रमाला महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह स्थायी समितीचे अध्यक्ष अशोक अण्णा पांगारकर, महिला बालकल्याण सभापती संध्या देठे, उपसभापती पद्मा मानधना, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, प्रमिला मोरे, यांच्यासह इतर अधिकारी व महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती. महिला बचत गटांना आर्थिक बळ देऊन त्यांना उद्योग क्षेत्रात पुढे आणण्यासाठी अशा योजनांचा मोठा फायदा होणार असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

# प्रत्येक वार्डमध्ये पाणीपुरवठ्याचा निश्चित वेळ जाहीर करावा

### नगरसेवक काठोठीवाले यांची मनपा विशेष सभेत मागणी



**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या विशेष सभेत प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक तसेच शिवसेना गटाचे प्रतोद दुर्गेश काठोठीवाले यांनी शहरातील मूलभूत समस्यांबाबत अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. त्यांनी सांगितले की, शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सतत सामना करावा लागत असून महानगरपालिका प्रशासनाने प्रत्येक वार्डमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी मागणी करताना सांगितले की, महानगरपालिकेने प्रत्येक वार्ड व प्रत्येक भागासाठी पाणीपुरवठ्याचा निश्चित वेळ ठरवून तो सार्वजनिकपणे जाहीर करावा, जेणेकरून नागरिकांना आधीच माहिती मिळेल की त्यांच्या भागात कोणत्या वेळेला पाणी येणार आहे. यामुळे नागरिकांना अनावश्यक त्रासाला सामोरे जावे लागणार नाही. त्यांनी पुढे सांगितले की, शहरात महानगरपालिकेचे अनेक बोअरवेल (बोअरिंग) बराच काळापासून बंद अवस्थेत आहेत, त्यामुळे पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. असे सर्व बंद बोअरवेल तात्काळ दुरुस्त करून पुन्हा सुरू करावेत, जेणेकरून नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल.

यासोबतच काठोटीवाले यांनी उन्हाळ्याचा विचार करून स्वच्छता व्यवस्थेकडेही विशेष लक्ष देण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की, शहरातील कचरा उचलण्यासाठी घंटागाडी नियमितपणे प्रत्येक वार्डमध्ये पाठविण्यात यावी, जेणेकरून शहरात स्वच्छता कायम राहील आणि नागरिकांना घाणीतून होणाऱ्या आजारांपासून संरक्षण मिळेल. तसेच त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ज्या भागांमध्ये स्वच्छता व्यवस्था समाधानकारक नाही आणि जिथे नियमित साफसफाई होत नाही, त्या भागातील संबंधित स्वच्छता निरीक्षकांवर कडक कारवाई करण्यात यावी.

नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांच्या या मागण्यांवर सभेत चर्चा झाली असून महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात, अशी त्यांनी अपील केली.

# पिंप्रुळा येथे यशवंत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ



**परतूर । प्रतिनिधी** - पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर आणि गावकऱ्यांच्या वतीने विविध क्षेत्रांमध्ये यश मिळवलेल्या यशवंत, गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी पिंप्रुळा गावचे उपसरपंच शामरावजी गाडगे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाळेचे मुख्याध्यापक, गणेश राठोड. या समारंभाला शाळेचे शिक्षक,विष्णू नाना कदम, प्रभाकर सुर्वे, प्रभाकर नळगे. विष्णू कांगणे,सचिन सोनखेडकर, उमाकांत ठाकरे, आणि पिंप्रुळा गावचे रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या गुणगौरव सोहळ्यामध्ये बॅनर वरील गुणवंतांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

उपस्थितांना, गणेश राठोड. प्रभाकर नळगे. दामोदर आवटे. यांनी मार्गदर्शन केले, सूत्रसंचालन इयत्ता नववीत शिक्षण घेत असलेल्या कावेरी कदम, आदिती नंदराज आवटे, कोमल गाडगे या विद्यार्थिनींनी केले.

प्रास्ताविक मी स्वतः केले तर मान्यवरांचे गावकऱ्यांच्या वतीने आभार महादेवजी गाडगे यांनी मानले.

हा गुणगौरव सोहळा यशस्वी होण्यासाठी राजेश गाडगे, नंदराज आवटे, सिताराम गाडगे, व समस्त गावकऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.

झाडे लावा झाडे जगवा

## जालना जिल्हा लोकअदालतीत ७१३ प्रकरणे निकाली; १४ कोटी ३३ लाखाहून अधिक तडजोड शुल्क वसूल

# दोन विखुरलेले संसार पुन्हा बहरले

**जालना । प्रतिनिधी** - उच्च न्यायालय, मुंबई व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यात शनिवार, दि.१४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीमध्ये एकूण ७१३ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असून, तब्बल १४ कोटी ३३ लाख ७७ हजार ४५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

लोकअदालतीचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा एम. मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी जिल्हा न्यायाधीश-०३ के. व्ही. मोरे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-०१ जी.आर. ढेपे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितेश बंडगर, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष परमेश्वर गडगीळे, जिल्हा सरकारी अभियोक्ता बाबासाहेब इंगळे व इतर न्यायालयीन अधिकारी उपस्थित होते. जालना जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये एकूण ३१८५६ प्रकरणे लोकअदालतीसाठी ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भूसंपादन, एन.आय. ॲक्ट कलम १३८ आणि दावा दाखलपूर्व प्रकरणांचा समावेश होता. या लोकअदालतीचे विशेष यश म्हणजे कौटुंबिक वादातील दोन प्रकरणे सामोपचाराने सुटली. परिणामी, दोन विभक्त राहणाऱ्या महिला पुन्हा आपल्या पतीच्या घरी नांदायला गेल्या असून दोन विखुरलेले संसार पुन्हा सुखाने बहरले आहेत. प्रलंबित प्रकरणे ६३०० प्रकरणांपैकी ५१० प्रकरणे निकाली निघाली. अशा प्रकारे एकूण ७१३ प्रकरणे तडजोडीने यशस्वीरित्या मिटवण्यात आली. दाखलपूर्व प्रकरणी २५,५५६ प्रकरणांपैकी २०३ प्रकरणे निकाली निघाली. ही लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी, बँक अधिकारी, पोलीस प्रशासन, उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. असे सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जालना जिल्ह्यात १९ मार्च रोजी यलो अलर्ट;

जालना,दि.१७ (जिमाका) : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांच्या अंदाजानुसार जालना जिल्ह्यात येत्या काही दिवसांत हवामानात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना खबरदारी घेणे गरजेचे आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी हवामान विभागाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष देऊन स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. जिल्ह्यात १७ व १८ मार्च रोजी जिल्ह्यात हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर १९ मार्च रोजी जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे विजांचा कडकडाट आणि वादळी वारे सुरू असताना घराबाहेर पडणे टाळावे.